**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर शंकरराव साळुंखे
महालक्ष्मी अपार्टमेंट, फ्लॅट नं.२, पहिला मजला,
जरगनगर जकात नाक्याजवळ, पाचगाव, ता.करवीर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.३.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.१२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१९.३.२००९ रोजी घेण्यात आली.

दि को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., नवे पारगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर या संस्थेबाबतची तीन मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे यांनी दिली नाही. म्हणून आपण अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. 'मागणी केलेली माहिती उपनिबंधक सहकारी संस्था, ता.हातकणंगले यांच्या अभिलेखाकडील आहे व माहिती मागणीकर्त्यास त्याच्या मागणीनुसार माहिती प्राप्त होणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना दंडात्मक कारवाईचे अधिकार नाहीत,' असे नमूद करून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी एक आठवड्यात माहिती नि:शुल्क देण्याचे आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिले. त्या मुदतीतही माहिती मिळाली नाही. या विलंबाबद्दल जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांना शास्ती लावावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.प्रभाकर शंकरराव साळुंखे यांनी लेखी निवेदनाद्वारे केली. आपण ज्येष्ठ नागरिक असून सुनावणीला उपस्थित राहणे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. माहिती देण्यास दि.१९.३.२००९ पर्यंत म्हणजे ७५ दिवसांचा विलंब झाल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.साळुंके यांनी निवेदनात केली आहे.

संबंधित संस्थेला दि.२९.८.२००८ रोजी माहितीबाबत पत्र पाठविले होते. माहिती संस्थेकडून दि.२७.१.२००९ च्या पत्रान्वये प्राप्त झाली, असे आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. मात्र दि.७.२.२००९

रोजीच ही माहिती आयोगाला सादर करण्यात आली असून अपीलकर्त्यास पाठविल्याचा उल्लेख नाही. तसेच श्री.साळुंके यांनी आयोगाला सुनावणीसाठी सादर केलेले लेखी निवेदन दि.१२.३.२००९ रोजीचे आहे. हे लक्षात घेता तोपर्यंत अपीलकर्त्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती पुरविली नव्हती. संस्थेकडून माहिती प्राप्त झाल्यापासून, म्हणजे दि.२७.१.२००९ ते १९.३.२००९ हा विलंबाचा कालावधी गृहीत धरला तरी त्यानंतरही ५१ दिवसांनी माहिती अपीलकर्त्यास दिल्याचे स्पष्ट होते. म्हणून जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे यांनी अपीलकर्ता श्री.प्रभाकर शंकरराव साळुंखे यांना माहिती देण्यासाठी ५१ दिवस इतका विलंब केला आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्यांना (५१दिवस X २५०रुपये प्रतिदिन=१२७५०) रूपये १२७५० इतकी शास्ती लावण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे यांच्या मे २०१०, जून २०१० व जुलै २०१० महिन्यांत मिळणाऱ्या अनुक्रमे एप्रिल २०१०, मे २०१० व जून २०१० च्या वेतनातून तीन हप्त्यांत ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अल्लाबक्ष अ रहिमान काझी
नुर बिल्डिंग, मालगाव रोड, खोतनगर,
मिरज, जि.सांगली **अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, जि.सांगली **उत्तरवादी**

जन माहिती **अधिकारी तथा** पुरवठा अव्वल कारकून,
मिरज तहसील कार्यालय, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६७/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |
| ३. | उपस्थित<br>**जन माहिती अधिकारी तथा** पुरवठा अव्वल कारकून,<br>मिरज तहसील कार्यालय, जि.सांगली श्री.सुनिल राजाराम ढाले | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.११.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.०१.२००८ |
| ७ | माहिती - [illegible] र्णाच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मिरज शहरातील गॅस एजन्सीच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, मिरज तहसील कार्यालय, जि.सांगली यांनी तीन आठवडे विलंबाने व अपुरी दिली. तसेच दिलेल्या प्रती वाचण्याजोग्या नव्हत्या. अपिलीय प्राधिकारी तथा

ल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जि.सांगली यांनी अपिलाची दखल घेतली नाही. त्यामुळे संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अल्लाबक्ष अ रहिमान काझी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलअर्जात व दि.१९.११.२००९ च्या लेखी निवेदनात केली आहे.

श्री.काझी यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, सांगली यांच्याकडे अर्ज केला होता. परंतु तहसीलदार, मिरज यांच्या कार्यकक्षेतील माहिती असल्यामुळे त्यांनी तो अर्ज तहसीलदार, मिरज यांच्याकडे वर्ग केला. गॅस एजन्सीकडे नोकरीला असलेले कर्मचारी, त्यांच्याकडील वाहनांचे क्रमांक इ.स्वरुपाची माहिती श्री.काझी यांनी मागितली होती. उपनगरासाठी गॅस एजन्सीने वितरण केंद्र खास का स्थापन केले नाही, अशा स्वरुपाचे प्रश्नही त्यांनी विचारले होते. देय माहिती त्यांना देण्यात आली. तथापि ती वाचता येत नसल्याची त्यांची तक्रार लक्षात घेऊन अपिलाच्या वेळी पुन्हा छायांकित प्रत दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून,मिरज तहसील कार्यालय, जि.सांगली श्री.सुनिल राजाराम ढाले यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य .

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

स्थळ : पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळासाहेब वसंतराव जगताप
नव महाराष्ट्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्था,
काळेकर मठामध्ये, सोमवार पेठ, मिरज,
जि.सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, जत, जि. सांगली **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** गट शिक्षण अधिकारी,
पंचायत समिती, जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जत, जि. सांगली<br>**जन माहिती अधिकारी तथा** गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, जत, जि.सांगली | श्री.बी.एन.जगधने<br>श्रीमती अरुणा द. इटाई |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.३.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

<u>विवेचन</u>

आपल्याला अपूर्ण माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्ता श्री.बाळासाहेब वसंतराव जगताप यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात म्हटले आहे.

श्री.जगताप यांच्या दि.५.१२.२००७ च्या अर्जावर दि.२८.१२.२००७ रोजी उत्तर पाठवून शुल्क कळविले. दि.१०.०१.२००८ रोजी त्यांनी शुल्क भरल्यावर त्याच दिवशी माहिती पाठविली. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती, जत, जि.सांगली यांच्याकडेच त्यांनी अपील केले. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती, जत, जि.सांगली श्रीमती अरुणा द. इटाई यांनी चर्चा करुन माहितीतील अपूर्णततेबाबत विचारणा केली. परंतु अपीलकर्त्यांनी तेव्हा व नंतरही याबाबत काहीही स्पष्ट केलेले नाही. आपल्या कार्यालयाकडील व विविध खात्यांकडून उपलब्ध करुन सर्व माहिती अपिलातही दिली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जत, जि. सांगली श्री.बी.एन.जगधने यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील अमान्य .

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. नारायण पांडुरंग दराडे
मु. अकोले, पो. निरगुडे,
ता. इंदापूर, जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती, जि. पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य,**
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७३/२०१०/पुणे |
| २ | मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :- सन २००१ ते २००९ या कालावधीत कंत्राटी तत्वावर नेमणूक झालेल्या अधिव्याख्यात्यांची माहिती, श्री. दराडे यांच्या वैयक्तिक धारिकेतील कागदपत्रांच्या छायाप्रती व सेवापुस्तकातील नोंदीसंदर्भात स्पष्टीकरण | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री नारायण पांडुरंग दराडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ.आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. उदय सदाशिव देशपांडे
'भिमाप्रसाद,' अंबिकानगर,
इंदापूर, पुणे

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
माढा, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,**
कूळ कायदा शाखा, तहसील कार्यालय,
माढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१/९/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९/१२/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/१/२०१०, १०/१२/२००९ |
| ५ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती :-**<br>मौजे अकोले बु ॥ येथील जमिन गट नं. १६८ जुना सर्व्हे नं. ४९ मध्ये इतर हक्कात असणारे कुळाचे नाव निरर्थक असतानाही ७/१२ पत्रकी का ठेवले याचा खुलासा | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. उदय सदाशिव देशपांडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जांसाठी व प्रथम अपिलांसाठी एकत्रितपणे अपील केलेले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील करणे आवश्यक आहे. सबब अपीलकर्ता श्री. देशपांडे यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अविनाश तात्यासाहेब शिंदे
पिताश्री कॉम्प्लेक्स, वंटमुरे कॉर्नर, सांगली रोड, मिरज, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, सांगली, मिरज आणि
कुपवाड शहर महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण मंडळ, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, सांगली, मिरज आणि
कुपवाड शहर महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण मंडळ, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७६ /सांगली / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, सांगली, मिरज आणि
कुपवाड शहर महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण मंडळ, सांगली श्री.ए.ए.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, सांगली, मिरज आणि
कुपवाड शहर महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण मंडळ, सांगली श्री.वाय.ए.पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.५.९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | निर्णय दिला नाही. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२०.११.२००९ रोजी घेण्यात आली.

आपल्या संस्थेकडील प्राथमिक शाळा अन्य संस्थेला बेकायदेशीरपणे हस्तांतरित करण्याबाबत जाणीवपूर्वक अपुरी व विलंबाने माहिती देऊन शाळा हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण केली व आपले नुकसान केले. त्याबद्दल दोषी अधिकाऱ्यांना शासन व्हावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अविनाश तात्यासाहेब शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व लेखी निवेदनात केली आहे.

श्री.शिंदे याचा अर्ज दि.३.११.२००७ राजी प्राप्त झाला. त्यांनी मागितलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती दि.२१.११.२००७ ला दिल्या. मागणीनुसार त्यांना सर्व प्रती साक्षांकित करून देण्यात आल्या. कोणतीही माहिती लपविलेली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण मंडळ, सांगली श्री.वाय.ए.पाटील यांनी केले.

श्री.शिंदे यांना माहिती देण्यात आली आहे. शाळा हस्तांतरणाच्या त्यांच्या तक्रारी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२३.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्रीमती. स्मिता बाळकृष्ण कुलकर्णी
आनंद कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१,
स.नं.३३/१, विद्यानगर,
एअरपोर्ट रोड, पुणे -३७

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी**
ॲक्शन फॉर ॲग्रिक्लचरल रिन्युअल इन महाराष्ट्र (अफार्म)
२/२३, अ,ब, रायसोनी पार्क, मार्केट यार्ड, पुणे ३७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
ॲक्शन फॉर ॲग्रिक्लचरल रिन्युअल इन महाराष्ट्र (अफार्म)
२/२३, अ,ब, रायसोनी पार्क, मार्केट यार्ड, पुणे ३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७७/२०१०/पुणे |
| २ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१/१/२०१० |
| ३ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-** सन १९९४ ते सन २००६ या कालावधीत डॉ. मुकुंद घारे यांनी अफार्मच्या संसाधनाचा व मनुष्यबळाचा व खाजगी कामासाठी केलेल्या वापराबाबत | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्त्या श्रीमती स्मिता बाळकृष्ण कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. त्यामुळे श्री. कुलकर्णी यांनी केलेल्या या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच याच विषयाबाबत त्यांनी पूर्वी केलेल्या अपिलांवर आयोगाने निर्णय दिलेला आहे. त्यामुळे पुन:पुन्हा त्याच संदर्भात अर्ज व अपिले न करण्याची समज अपिलकर्त्यास दिलेली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 18 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शरद बाबुराव पाटील
प्लॉट नं.१०/७६ अ/१, बाबू पार्क, बहिरेवाडी,
पो.वारणानगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी तथा प्रकल्प संचालक
पुनर्वसन, जिल्हाधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
क।। बावडा रोड, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार पुनर्वसन,
जिल्हाधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, क।। बावडा रोड, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८३ / कोल्हापूर / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी तथा प्रकल्प संचालक
पुनर्वसन, जिल्हाधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
क।। बावडा रोड, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.पी.आय.शिरोळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

पुनर्वसनाशी संबंधित दिलेल्या परवानगीच्या छायांकित प्रती आपण मागितल्या असता विक्री व खातेफोडीबाबतच्या परवानगीची माहिती दिली व तीही विलंबाने देण्यात आली. माहिती वेळेत पाठविली, असे दर्शविण्यासाठी आधीची तारीख घालून पाठविली, असे अपीलकर्ता श्री.शरद बाबुराव पाटील यांनी प्रतिपादन केले. त्याबद्दल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

श्री.पाटील यांनी सन १९७८ पासूनची माहिती मागितली असून विहित मुदतीत त्यांना उपलब्ध माहिती देण्यात आली. जिल्हा पुनर्वसन अधिकारी हे अपिलीय प्राधिकारी असून हे पद रिक्त असल्यामुळे उपविभागीय अधिकारी, राधानगरी उपविभाग, ता.राधानगरी. जि.कोल्हापूर यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी पत्राद्वारे, तसेच दूरध्वनी संदेशाद्वारे पूर्वसूचना दिली होती. परंतु श्री.पाटील उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे त्यांना नेमकी कोणती माहिती मिळाली नाही, हे स्पष्ट झालेले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार पुनर्वसन, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, क|| बावडा रोड, कोल्हापूर श्री.अनिल कारंडे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, कोल्हापूर श्री.सूरज वाघमारे यांनी लेखी व

तोंडी नमूद केले. त्यांचे प्रतिनिधी श्री.पी.आय.शिरोळे यांनी त्यांच्या प्रती सादर केल्या. श्री.पाटील यांच्या मूळ मागणीतील मुद्दा क्र.२ बाबतचे सुस्पष्ट उत्तर त्यांना त्वरित द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१५.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.वासुदेव गणेश संकपाळ
ज्योती, १५ विकास नगर, होटगी रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपीक,
लेखा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८७ / सोलापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |
| ३ | **उपस्थिती :-**<br><br>**अपीलकर्ता :** श्री वासुदेव गणेश संकपाळ<br>ज्योती, १५, विकास नगर, होटगी रोड, सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा:-** निवासी उपजिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर प्रतिनिधी श्री.एच.पी.निकम<br><br>**जन माहिती अधिकारी तथा :-** प्रमुख लिपीक,<br>लेखा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.एच.पी.निकम | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.८.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.९.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळीउभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१९.११.२००९ रोजी घेण्यात आली.

सेवानिवृत्त सरकारी कर्मचाऱ्याच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आपण कार्य करीत असून एका प्रकरणी 'प्रचलित व अलिखित कार्यपध्दतीप्रमाणे कार्यवाही' केल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, लेखा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी कळविले. अशा कार्यपध्दतीची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, लेखा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलपूर यांच्याकडून मिळाली नाही. अशी कार्यपध्दती अस्तित्वात नसताना तशी माहिती देणाऱ्या व अयोग्य कार्यपध्दती अवलंबिणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.वासुदेव गणेश संकपाळ यांनी केली.

श्री.संकपाळ यांनी अन्य कर्मचाऱ्यांच्या प्रकरणासंदर्भातील उत्तरावरून ही माहिती मागितली होती. त्याबाबत त्यांना उत्तर देण्यात आले. 'प्रचलित व अलिखित कार्यपध्दती' असा शब्दप्रयोग उत्तरात नमूद करण्यात आला असून त्या संदर्भातील अशा स्वरूपाची माहिती नमूद नसल्यामुळे देण्यात आली नाही. हा शब्दप्रयोग अयोग्य असल्याचे प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी स्पष्ट करून अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी स्वतः दिलगिरी व्यक्त केली. तत्कालीन संबंधित लिपिक श्री.द.द.शेख यांनीही असे उत्तर देण्यात चूक झाल्याचे सांगून दिलगिरी व्यक्त केली, असे जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, लेखा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.एच.पी.निकम यांनी नमूद केले. अशा

स्वरूपाची लेखी कबुली आपल्याला मिळावी अशी मागणी श्री.संकपाळ यांनी केली. अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी श्री.संकपाळ यांना तसे लेखी द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार स्पष्टीकरण करून दिलगिरी व्यक्त करणारे व तत्कालीन लिपिक श्री.द.द.शेख यांना अशा उत्तराबद्दल जबाबदार धरून समज देण्याबाबत प्रस्ताव सादर केल्याचे पत्र श्री.संकपाळ यांना दि.२०.११.२००९ रोजी दिल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.सु.द.जाधव यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१७.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सुरेश अ.आचरेकर व श्री. पी. के. कुलकर्णी,
रामचंद्र सह. गृहनिर्माण संस्था,
४४ ब, तुळजाभवानी सोसायटी,
राधानगरी रोड, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्रधिकारी तथा उपसचिव,**
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (ई -४),**
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८८/२०१०/कोल्हापूर |
| २ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१/१०/२००९ |
| ३ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत अपिलासोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुरेश अ. आचरेकर व श्री. पी. के. कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. मनोहर तुकाराम चौत्रे
प्लॉट नं.३, गुरुकृपा,
राजोपाध्येनगर, राधानगरी रस्ता,
कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्रधिकारी तथा तहसीलदार,**
तहसीलदार कार्यालय करवीर,
जि. कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय करवीर,
जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८९/२०१०/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८/११/२००९ |
| ३ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>श्री  दत्तगुरु सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भातील माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. मनोहर तुकाराम चौत्रे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत आवश्यक शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. गुंडाप्पा बाबु धुळासावंत
नेहरु चौक, नांदणी,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्रधिकारी तथा सहायक निबंधक,**
सहकारी संस्था तहसील शिरोळ,
जयसिंगपूर, जि. कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
भारत अर्बन को-ऑप. बँक मर्यादित,
जयसिंगपूर, ता. शिरोळ,
जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९०/२०१०/कोल्हापूर |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/११/२००९ |
| ३ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>भारत अर्बन को-ऑप.बँक मर्यादित, जयसिंगपूर संदर्भात एकूण ४१ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गुंडाप्पा बाबु धुळासावंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे विहित नमुन्यात केलेले नाही. तसेच अपिलासोबत आवश्यक शुल्क (रु.२०/- चे मुंद्राक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

ॲड. आबासाहेब गोपाळराव पाटील
मु. पो. खामगाव, ता. बार्शी,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. - १,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९२/ २०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.६.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.८.२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.१२.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br><br>सन २००३ ते २००७ या कालावधीत सोलापूर ते बार्शी रा.मा. क्र -१५१ वरील साखळी क्र.-४९/०० ते ५३/०० मधिल गटर खोदाईच्या कामाची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता ॲड. आबासाहेब गोपाळराव पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या मुदतीत केले नसल्याचे सदर अपील मुदतबाहय आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. 23 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक, छत्रपती ताराराण विकास आघाडी, शिरोळ तालुका,
कलादालन, मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
दहीवडी कॅम्प, वडूज कार्यालय, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक, छत्रपती ताराराणी विकास आघाडी, शिरोळ तालुका,
कलादालन, मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
दहीवडी कॅम्प, वडूज कार्यालय, जि.सातारा प्रतिनिधी श्री.पी.डी.नाईक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.२.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण केलेल्या तक्रार अर्जावर गृहराज्यमंत्री, राज्यमंत्री, विधी व न्याय यांनी पोलीस अधीक्षक, सातारा यांना दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती ४३ दिवस विलंबाने व संदर्भहीन अशी दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी यांनी केली.

श्री.धर्माधिकारी यांनी केलेला अर्ज दि.१८.११.२००८ रोजी प्राप्त झाला. संबंधित माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी, दहीवडी कॅम्प वडूज यांच्या संबंधातील असल्यामुळे दि.२४.११.२००८ रोजी अर्ज त्यांच्याकडे पाठविला. मात्र दरम्यानच्या काळात श्री.धर्माधिकारी यांच्या मूळ अर्जाची चौकशी वडूज पोलीस ठाण्याकडे प्रलंबित होती. वडूज पोलीस ठाण्याने दि.७.१.२००९ रोजी चौकशी पूर्ण करून दि.११.१.२००१ रोजी श्री.धर्माधिकारी यांना माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, दहीवडी कॅम्प, वडूज कार्यालय, जि.सातारा यांचे प्रतिनिधी श्री.पी.डी.नाईक यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या तशा आशयाच्या लेखी निवेदनाची प्रत त्यांनी सादर केली. केवळ असेलेली माहिती अपेक्षित नव्हती. चौकशी पूर्ण करून माहिती दिली असल्याने विलंब झाला असे त्यांनी नमूद केले.

श्री.धर्माधिकारी यांनी विलंब व संक्षिप्त स्वरूपाची माहिती याबाबत उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सातारा यांनी एक आठवड्यात स्पष्टीकरणात्मक अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सातारा डॉ.डी.पी.प्रधान यांनी दि.२९.६.२००९ च्या पत्रान्वये स्पष्टीकरणात्मक अहवाल आयोगाला सादर केला व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठविली. हा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

पुणे
दि.१७.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. मनोहर तुकाराम चौत्रे
प्लॉट नं.३, गुरुकृपा,
राजोपाध्येनगर, राधानगरी रस्ता,
कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्रधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९६/२०१०/कोल्हापूर |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/१०/२००९ |
| ३ | **<u>मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-</u>**<br>कोल्हापूर जिल्हा परिषद, बांधकाम विभाग अंतर्गत दि.१/६/१९९० पासून सुरु करण्यात आलेल्या नवीन उपविभागाच्या कायदेशीर वैद्यतेबाबत व नवीन उपविभागातील नियुक्त्यांबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. मनोहर तुकाराम चौत्रे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 22 MAR 2010